# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/१२/२०२५ (गुरूवार )**

## नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे दिनांक २४/१२/२०२५ ते दि.३१/१२/२०२५ रोजीपर्यंत राबविण्यात येत आहे ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह ,अवैध दारू बाबत विशेष मोहीम

## विशेष मोहीमे अंतर्गत करण्यात आल्या मोटर वाहन अधिनियम अन्वये २६८ कारवाई आणि अवैध दारू बाबत २५ गुन्हे दाखल

नाताळ सणानिमित्य तसेच नववर्षा निमित्य शासनाने दिनांक २४/१२/२०२५, दिनांक २५/१२/२०२५ व दि. ३१/१२/२०२५ रोजी रेस्टॉरेन्ट व इतर मनोरंजनात्मक आस्थापना यांना रात्री उशिरापर्यंत उघडया ठेवण्यास दिलेली मुभा पाहता ड्रंक अॅन्ड ड्राईव्हमुळे होणाऱ्या अपघाताला आळा बसण्याकरीता मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली संपुर्ण जिल्हयात दिनांक २४/१२/२०२५ ते दिनांक ३१/१२/२०२५ रोजीपर्यंत ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह, अवैध दारू तसेच इतर अवैध धंदयावर कारवाई कामी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. सदर मोहीमेअंतर्गत ६ उपविभागामध्ये वाहतुक शाखेचे ६ पथके नेमण्यात आले आहे. वाहतुक शाखेने विविध ठिकाणी फिक्स पॉईट लावले असुन. नागपुर ग्रामीण जिल्हयाअंर्तगत २१ पोलीस स्टेशन स्तरावर सुध्दा विविध ठिकाणी नाकाबंदी फिक्स पॉईट लावण्यात आलेले आहे. **सदर मोहीमेअंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २४/१२/२०२५ रोजी मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह च्या २४ कारवाई, तसेच विना हेल्मेट, विना परवाना, ओव्हर स्पीडच्या आणि इतर २४४ कारवाई अशा एकुण २६८ कारवाई केल्या आहे.**

दिनांक २४/१२/२०२५ रोजी अवैध दारू विक्रेते,दारू काढणारे तसेच सेवन कारणाऱ्यांवर कारवाई करत महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये **एकुण २५ गुन्हे नोंद** केले

आहे. सदर कारवाईत १११६० मिली देशी दारु, १९२ लीटर मोहाफुल दारू, ३०० लीटर मोहाफुल सडवा तसेच इतर साहीत्य असा एकुण ४३,१५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.

**मद्यप्राशन करून वाहन चालवितांना चालक मिळून आल्यास त्यांच्यावर मोटार वाहन कायदया अन्वये कारवाई करण्यात येईल सदर प्रकरणात मा न्यायालयाकडुन १०,०००/— रूपयांपर्यंत दंड होवु शकतो. नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे संपुर्ण जिल्हयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नववर्ष, तसेच इतर सणोत्सव आनंदात साजरा करावा परंतु स्वसुरक्षा म्हणुन वाहन चालवितांना मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, हेल्मेट चा वापर करावा, वाहतुक नियमांचे पालन करावे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद ३ वाहनांसह ८० लाख ९० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २५/१२/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी बायपास चौक येथे नाकाबंदी केली असता वाहन क्रं १) टाटा कंपनीचा १० चक्का टिप्पर क्र एम एच ४० वाय १०३८ आणि वाहन क्रं २) अशोक लेलॅंड कंपनीचा १० चक्का टिप्पर क्र एम एच ४० सीटी १४१४ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन क्रं १) चा चालक हर्षल अनिल भालेराव, वय २२ वर्ष, रा. प्लॉट क्रं १०७, बाहदुरा, नागपुर आणि वाहन क्रं २) चा चालक दिपक रामप्रसाद कंगाले, वय २२ वर्ष, रा. मोहगवा झिल्पी, नागपुर हे मिळुन आले.** तसेच पोलीसांनी कळमना फाटा, डी मर्सी हॉटेल जवळ नाकाबंदी केली असता अशोक लेलॅंड कंपनीचा १० चक्का टिप्पर क्र एम एच ३३ टी ५९९९ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असत त्यामध्ये रेती आढळुन आली. **चालक आरोपी रोहीत राजु उरकुडकर, वय २५ वर्षे, रा. पवनी, जि भंडारा हा मिळुन आला.** नमुद आरोपीतांना रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद तिन वाहने किमती ८०,००,००० /—रूपये**

**आणि वाहन क्रं १ आणि २ मधुन ५ ब्रास रेती, वाहन क्रं ३ मधुन ८ ब्रास रेती एकुण १८ ब्रास रेती किंमती ९०,०००/— रूपये असा एकुण ८०,९०,०००/रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

## पर्यावरणास अपायकारक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे नरखेड :—** दिनांक २४/१२/२०२५ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, इंदीरा नगर नरखेड येथे **गणेश गोविंदराव डोंगरे, वय ३५ वर्ष, रा. ईंदीरा नगर, नरखेड ता. नरखेड, जि.** नागपूर हा आपले राहते घरी प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नरखेड पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले आणि आरोपीच्या घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता घराचे बाहेरील खोलीत एका पांढऱ्या बोरीत नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीमध्ये गुंडाळलेले मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून एकुण ११ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ६,६००/— रूपये असा एकुण ६,६००/— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम १२५, २२३ भा.न्या.सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक २४/१२/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा खडगाव येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे १) रवी अशोक मेश्राम, वय ३१ वर्ष, रा. जुनी वस्ती, दाभा नागपुर २) आशिष मधुकर सोमकुवर, वय ३८ वर्ष, रा. पारडी नागपुर ३)पांडया उर्फ अक्षय प्रेमलाल परतेकी, वय २६ वर्ष, रा. फुटाळा ४) नितीन हरिदास उके, वय २८ वर्ष, रा. वैभव नगर, नागपुर वाडी ५) मोनु अशोक धुरीया, वय ३५ वर्ष, रा. सुरक्षा नगर, दत्तवाडी नागपुर** हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन तासपत्ते व रोख रक्कम १२,४००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

**नमुद आरोपी क्र. १ ते ५ यांच्या विरूद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**